Reg. No. MAH/7103/Jalgaon/F/6266/Jalgaon

# School of Environment

Project of Samarpan, Jalgaon

45, Chatrapati Shahu Complex, Jalgaon : 'Shardashram' Vidyut Colony, Jalgaon Ph. 0257-2234394 Mobile : 9225124311, 9923362800

मा.श्री. / सौ. प्रकाशजी जावडेकर

सप्रेम नमस्कार !

**विषय :- सॅन्चुरी एशिया या आंतरराष्ट्रीय मासिकात यावल अभयारण्याच्या दुरावस्थे विषयी प्रसिध्द झालेला लेख...**

सन २००९ पासून आपण पर्यावरण शाळेच्या माध्यमातून पर्यावरण क्षेत्रात कार्य करण्यास प्रारंभ केला; प्रारंभीच्या काळात विद्यार्थ्यांसाठी क्षेत्र भेटी, व्याख्याने, कार्यशाळा, अशा रचनात्मक कार्यक्रमांच्या माध्यमातून पर्यावरण शाळेच्या कार्याचा विस्तार होत गेला, त्यानंतर २००८ मध्ये मृद्गंध व त्यानंतर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या आयोजनात पर्यावरण शाळेने पुढाकार घेतला, विद्यार्थी - युवकच नव्हे, तर जळगावकरांनी या कार्यक्रमला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आहे.

सन २००८ पासून ''वनहक्क कायदा - २००६ ची'' अंमलबजावणी सुरु झाली आणि आता वर्षानुवर्षे अन्याय सहन करणाऱ्या आदिवासींना हक्काची जमीन मिळून त्यांच्यावरील ऐतिहासिक अन्याय दूर होणार, अशी अपेक्षा होती. परंतु या कायद्याचा दुरुपयोग होऊन प्रचंड प्रमाणावर वनक्षेत्रावर अतिक्रमण होऊ लागले. जळगांव - धुळे - नंदुरबार (खान्देश) जिल्ह्याचे संपूर्ण वनक्षेत्र आता उध्वस्थ होण्याच्या मार्गावर आहे. या समस्येकडे पर्यावरण शाळेने लक्ष वेधले आणि २००९ मध्ये सातपुडा बचाव कृती समितीची स्थापना करण्यात आली, त्यात २० स्वयंसेवी संस्था सहभागी झाल्या, मोर्चे, धरणे, परिषदा इ. माध्यमातून या कायद्याच्या गैरउपयोगाविषयी आवाज उठविण्यात आला. सन - २०१० मध्ये केंद्रिय वन व पर्यावरण मंत्रालयाच्या समीक्षा समितीपुढे सादरीकरण करण्यात आले, महाराष्ट्राच्या वनखात्याच्या प्रधानसचिवांसोबत वनक्षेत्रात स्वतंत्र दौरे करून वास्तविक परिस्थिती समोर आणण्यात सातपुडा बचाव कृती समितीचे योगदान महत्वपूर्ण आहे.याचीच फलश्रुती म्हणून यावल अभयारण्यातील अवैध अतिक्रमण हटविण्याचे अभियान सुरु आहे. वनक्षेत्राच्या अपरिमित हानीमुळे वाघांनी केळीच्या क्षेत्रात आश्रय घेतला, बिबटे सैर भेर होत गावांकडे वळले,सर्वात मोठे दुर्दैव म्हणजे अतिदुर्मिळ रानपिंगळा नामशेष होऊ लागला. पर्यावरण शाळेच्या माध्यमातून वढोदा व्याघ्र संवर्धन प्रकल्प आणि वढोदा ते आनेर व्याघ्र संचार प्रकल्पाचा संकल्पनात्मक आराखडाही तयार करण्यात आला असून, तो वनखात्याच्या प्रधान सचिवांना पाठविण्यात आला आहे.

जळगांव जिल्ह्यातील वनक्षेत्राचे गंभीर प्रश्न निरनिराळ्या व्यासपिठावर उपस्थित करीत असतांना, सॅन्चुरी एशिया या आंतरराष्ट्रीय स्तरावरील मासिकामध्ये सदर प्रश्न उपस्थित करण्याची संधी मला जून - २०१४ च्या अंकात मिळाली असून 'THE ASSASSINATION OF YAWAL' शिर्षकाखाली पृष्ठ क्र.- ७२,७३,७५ वर हा लेख प्रकाशित झाला आहे. आपल्या अवलोकनार्थ सदर लेख पाठवित आहे. तरी कृपया आपला अभिप्राय कळवावा व सातपुडा बचाव अभियानामध्ये आम्हाला सहकार्य करावे, ही आग्रहाची विनंती !

कळावे

धन्यवाद ! आपल्या सहकार्याची अपेक्षा आहे.

आपला विश्वासू

राजेंद्र नन्नवरे

निमंत्रक सातपुडा बचाव कृती समिती

कार्यकारी संचालक - पर्यावरण शाळा